**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2020, VOL- 8/61*

# अभ्यासक्रम व पाठ्यक्रम : एक दृष्टिक्षेप

**प्रा.लक्ष्मण वायळ**

*असि. प्रोफेसर, मविप्र समाज, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक :** शाळा म्हणले की विद्यार्थी,शिक्षक,अध्ययन, अध्यापन,परीक्षा, या बरोबरच अभ्यासक्रम,पाठ्यक्रम,पाठ्यपुस्तक, या गोष्टी डोळ्यासमोर उभ्याराहतात.यातीलच महत्वाचा भाग म्हणजे अभ्यासक्रम व पाठ्यक्रम होय.

अभ्यासक्रमास इंग्रजी भाषेत Curriculum पर्यायी शब्द आहे.अभ्यासक्रम- मूळ लॅटीन शब्द आहे.मूळ लॅटिन शब्दाचा अर्थ- शर्यतीची धावपट्टी( Race Course) असा आहे. घोड्याच्या शर्यतीत निघावयाच्या स्थानापासून आपले लक्ष गाठे पर्यंतचे अंतर. अध्ययंनाने आक्रमावयाचा संपूर्ण मार्ग असा होतो.

**अभ्यासक्रमाच्या काही व्याख्या :**

1. The Whole body of course offered by and Educational institution. शिक्षणसंस्था देत असलेला संपूर्ण पाठ्यक्रम होय.
2. अभ्यासक्रम म्हणजे शालेय जीवनातून मिळणारे सर्व प्रकारचे संस्कारक्षम अनुभव होय.
3. ब्रूबेकर(Brubaker): अभ्यासक्रम म्हणजे विशिष्ट वातावरण वा पार्श्वभूमीवर व्यक्तीस प्राप्त होणारा अनुभव होय.
4. एडवर्ड किंग(Edward king): शाळेने बालकांना इच्छित अध्ययन अनुभवांची संधी मिळावी म्हणून पुरविलेले सर्व मार्ग.
5. मनरो(monroe): शिक्षणाची ध्येय साध्यकरण्यासठी शाळेने उपयोगात आणलेल्या सर्व अनुभवांचा अभ्यासक्रमात समावेश होतो.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

6. कॅसवेल : अभ्यासक्रम म्हणजे बालकांच्या जीवनात व बालकांशी संबंधित असे शिक्षकांच्या व पालकांच्या जीवनात जे जे काही घडते ते शालेय वेळात बालकांना व्यापून टाकणारा परिसर म्हणजे अभ्यासक्रम.

वरील संकल्पना वरून असे लक्षात येते की अभ्यासक्रम हा उद्दिष्टे प्राप्तीचे एक साधन आहे.आणि हा अभ्यासक्रम सुधारलेल्या देशात शाळांना व शिक्षकांना तयार करावा लागतो. तर भारतात अभ्यासक्रम तयार करण्याचे काम शासन करते.

**अभ्यासक्रम रचनेचे हेतू :**

- बालकांच्या भाव-भवनांचा विकास व्हावा.
- बालकांमध्ये योग्य दृष्टीकोण प्राप्त व्हावा.
- बालकांमध्ये किमान कौशल्य संपादित व्हावीत.
- बालक क्रियाशील बनावेत.
- बालकांच्या व्यक्तिमत्वचा विकास व्हावा
- बालकांना ज्ञान प्राप्त व्हावे.

**अभ्यासक्रम रचनेच्या पध्दती :**

- कालक्रमपध्दती chronological method
- समकेंद्री पध्दती concentric method
- कालखंड पध्दती periodic method
- परावर्तन पध्दती Regressive Approach
- चरित्र पध्दती Biographical Approach
- विशिष्ट विषय पध्दती Topical Method
- पॅच पध्दती Patch Method
- आधार व मूळ स्रोत पध्दती Sources Method

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**पाठ्यक्रमाच्या काही व्याख्या :**

1. विशिष्ट कालावधीत पूर्ण करण्यासाठी विषयाचा जो आराखडा तयार केलेला असतो त्यालाच पाठ्यक्रम असे म्हणतात.
2. प्रत्येक इयत्तेत जो अभ्यासक्रमाचा भाग असतो त्याला पाठ्यक्रम म्हणतात. बालकांना ज्ञान प्राप्त व्हावे.

**अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यातील फरक**

| अभ्यासक्रम | पाठ्यक्रम |
|---|---|
| 1. शिक्षणातील स्तरानुसार अभ्यासक्रम तयार केला जातो.<br>2. अभ्यासक्रमामध्ये एकूण शिक्षणाची ध्येय व सर्वसामान्य उद्दिष्टे विचारात घेतली जातात.<br>3. अभ्यासक्रम केवळ ढोबळ मार्ग दाखवतो.<br>4. अभ्यासक्रम कालावधी जास्त असतो.<br>5. अभ्यासक्रमाचे स्वरूप व्यापक असते.<br>6. अभ्यासक्रम लवचिक असतो.<br>7. अभ्यासक्रम हा व्यक्तिविकासावर केंद्रित असतो.<br>8. अभ्यासक्रम शाळा व समाज यांच्याशी संबधीत असतो.<br>9. अभ्यासक्रमात अनेक विषय असतात. | 1. पाठ्यक्रम प्रत्येक इयतेसाठी स्वतंत्र असतो.<br>2. पाठ्याक्रमामध्ये विशिष्ट इयत्तेची त्या वर्षात सध्या होणारी उद्दिष्टे विचारात घेतली जातात.<br>3. पाठ्यक्रम अभ्यासक्रमाने दर्शविलेल्या मार्गातील टप्पे निश्चित करतो.<br>4. पाठ्यक्रमाचा कालावधी बहुदा एक वर्षाचा असतो.<br>5. पाठ्याक्रामाचे स्वरूप मर्यादित असते.<br>6. पाठ्यक्रम ताठर असतो.<br>7. पाठ्यक्रम हा विषयज्ञानाच्या विकासावर केंद्रित असतो.<br>8. पाठ्यक्रम बालकांच्या व विषयज्ञानाच्या विकासाशी संबधित असते.<br>9. पाठ्यक्रमात एकच विषय असतो. |

**समारोप :**

अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यक्रम असतो.आणि या पाठ्यक्रम व अभ्यासक्रमाच्या आधारे विध्यार्थ्याचा व्यक्तिविकास साधण्याचा प्रयत्न केला जातो.

**संदर्भसूची:**

*इतिहास शिक्षण -डॉ.रामदास बरकले, डॉ.नलिनी पिचड,प्रा.सूर्यवंशी*
*इतिहासाचे अध्यापन शास्त्रीय विश्लेषण - डॉ.रामदास बरकले, डॉ. सूर्यभान वाजे*
*इतिहास शास्त्र की कला - घाटे वि. द.*
*इतिहासाचे अध्यापन -पारसनीस न.रा.*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*